11

**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक ०४/०३/२०२३**

आरोपी लोकसेवक - श्री.मदनसिंग रायसिंग घुणावत, वय 42 वर्षे, पद- सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन एमआयडीसी वाळुज औरंगाबाद शहर, (वर्ग-2) यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाचेची रोख 10,000/- रुपये स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे एमआयडीसी वाळुज, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री.मदनसिंग रायसिंग घुणावत, वय 42 वर्षे, पद- सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन एमआयडीसी वाळुज औरंगाबाद शहर, (वर्ग-2) रा. सिल्वर वुड, प्लॅट नं.201 हर्सुल टि पॉईट औरंगाबाद |
| लाच मागणी रक्कम | :- | 20,000/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 10,000/- रुपये. |
| तपास अधिकारी | :- | श्रीमती रेश्मा सौदागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांनी पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने तक्रारी मधील नमुद गैरअर्जदार यांचे कडुन पैसे काढुन देण्यासाठी व तक्रारदार यांना मदत करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांनी पो.स्टे.एम.वाळुज औरंगाबाद शहर येथे त्यांना प्लॉट खरेदी संदर्भात आर्थीक फसवणुक मानसिक व शारिरीक त्रास देत असले बाबत अर्ज दिला होता. सदर तक्रारी अर्जातील गैरअर्जदार यांचे कडुन प्लॉट संदर्भात अडकलेले पैसे काढुन देणे व गुन्हयात मदत करणेसाठी आ.लो.से. श्री.मदनसिंग घुणावत सहायक पोलीस निरीक्षक हे तक्रारदार यांच्याकडे 20,000/- रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से.श्री मदनसिंग रायसिंग घुणावत यांनी तक्रारदार यांच्याकडे 20,000/- रुपयाची मागणी करुन तडजोडीअंती पहीला हप्ता म्हणुन 10,000/-रुपये लाचेची मागणी करुन पंच साक्षीदारांसमक्ष स्विकारण्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दि.04/03/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. श्री.मदनसिंग रायसिंग घुणावत, वय 42 वर्षे, पद- सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन एमआयडीसी वाळुज औरंगाबाद शहर, (वर्ग-2) यांनी लाचेची रक्कम 10,000/-रुपये पंच साक्षीदारा समक्ष पोलीस स्टेशन एमआयडीसी वाळुज, औरंगाबाद शहर येथील कार्यालयात स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह आ.लो.से. श्री.मदनसिंग रायसिंग घुणावत, सहाय्यक पोलीस निरीक्षक, यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.ठाणे एमआयडीसी वाळुज, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.श्री.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा.श्री.विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रेश्मा सौदागर, यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोअं/रविंद्र काळे, दिगंबर पाठक, शिरिष वाघ, चालक पो.अ. चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद

ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994

पोलीस उप अधीक्षक :- 9356115189


पोलीस उप अधिक्षक कार्यालय ॲन्टी करप्शन ब्युरो औरंगाबाद

(मारुती शंकर पंडित)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद.